# संपादकीय

जून महिण्यात नगरला दलित साहित्य संमेलन झाले. अलिकडे साहित्य संमेलनाची संख्या बरीच वाढू लागली आहे. जिल्हा संमेलन, ग्रामीण, दलित, आदीवासी अशी साहित्य संमेलने होऊ लागली आहेत. ही खरोखरच स्वागताची गोष्ट आहे. साहित्यामध्ये आताशीक गावकुसाबाहेरचा माणूस नायक बनू लागला आहे. पण स्त्रीची कोंडी मात्र अजूनही प्रस्थापित वा विद्रोही वाङमयात म्हणावी एवढी व्यक्त होत नाही. विद्रोही लेखकांमध्ये स्त्रियांचे प्रमाण कमी असणे साहजिक आहे पण ज्या उच्चविद्या विभूषित स्त्रिया लिहू लागल्या आहेत त्यांच्या चित्रणातील स्त्रीही अजून लैंगिक प्रश्नाभोवती घुटमळते आहे. बॅडमिंग्टन कोर्ट भोवती घुटमळते आहे. स्त्रीच्या हरप्रकारच्या अत्याचाराविरुद्ध आज मूठभर स्त्रिया बोलू लागल्या आहेत. याच काळात म्हणजे अलीकडे सुप्रसिद्ध पंजाबी लेखिका अमृता प्रीतम यांना ज्ञानपीठ पारितोषिक साहित्य अकादमीचा पुरस्कारही मिळाला. अमृता प्रीतम यांच्या लिखाणाला स्त्रीच्या हरप्रकारच्या वेदनेची, कोंडीची धार आहे. पण वर व्यक्त केल्याप्रमाणे हरभाषेमध्ये स्त्रीची कोंडी वेदना, तिचे चारभिंती आडचे बाहेरचे हुंकार, तिच्या एकाकी आणि सामूहीक लढती यायला हव्या आहेत

गेले दशक हे विद्रोहाचे दशक आहे. जगाच्या इतिहासात अनेक प्रस्थापित शक्तींना तडे बसल्याच्या महत्वपूर्ण घटना घडल्या. अबला, गरीब गाय म्हटल्या जाणाऱ्या भारतीय स्त्रीनही आपल्या या प्रतिमेला तडा द्यायला सुरुवात केली आहे. हजारो कष्टकरी स्त्रिया आज शेते, कारखाने, ऑफिसे यामध्ये आपल्या अन्यायाविरुद्ध लढतायत, बुद्धीजीवी स्त्रिया कौटुंबिक, अन्यायाच्या निषेधार्थ रस्त्यावर येतायत. आणि याचं चित्रण यायला हवंय साहित्यात ! कारण स्त्री स्वतःवरच्या अन्यायाविषयी बोलते, न्याय मागायला रस्त्यावर येते तेव्हा तिने स्वतःत असलेल्या अबलापणाशी, गरीब गायीशी केवढी तरी झुंज दिलेली असते. कोण्या एका कविने लिहिलं आहे.

अबोलीच्या झाडाला फुलं आली
का हीन बोलता सुकून गेली.
अबोलीच्या झाडाची तोच एक व्यथा आहे
स्त्री जातीच्या व्यथेचं तेच एक प्रतिक आहे.

पण काव्यातली साहित्यातील स्त्रीची प्रतिमा आता प्रत्यक्षात बदलू लागली आहे. स्त्रियांचे मुकेपण संपले आहे. साहित्य चित्रपटातही त्याचे प्रतिबिंब पडसाद उमटायला हवेत. बायजा ही सुद्धा हे मुकेपण संपल्याची खुण आहे. स्त्रीचं वास्तव चित्रण स्त्रियांनी केलंच पाहिजे पण पुरुषांनीही केलं पाहिजे. चळवळीतल्या प्रत्येक लढ्यात लेखणीची साथ ही मोलाची असतेच म्हणूनच स्त्रीच्या हुंकार वेदना विरश्रीने भरलेल्या विद्रोही साहित्याची अपेक्षा आणि आवश्यकता आहे. ती काळाची गरज आहे.

---

## सूचना

(१) ज्यांची वर्गणी संपली आहे त्यांनी कृपया हेच स्मरणपत्र समजून ९ रु. भरुन वर्गणीचे नूतनीकरण करावे.

(२) 'बायजा' ऑफिसशी पत्रव्यवहार करताना कृपया वाढलेल्या पोस्टेजची नोंद घ्यावी.

(३) 'बायजा 'कडे साहित्य पाठवताना त्याबरोबर परतीसाठी पुरेसे पोस्टेज पाठवावे. नापसंत लेख परत पाठविले जातील.

(४) बायजाचे वर्गणीदार आणि वाचक वाढविण्याचा प्रयत्न करून बायजाच्या सामाजिक प्रबोधनाच्या कार्यात आपणही सक्रीय सहभागी व्हावे ही विनंती.

— संपादक